| MHDH070001542026 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६२/२०२६.<br>(अरुणाबाई निंबा गोसावी व इतर<br>विरुध्द<br>कोणीही नाही.) |
|---|---|

**निशाणी क्र. १ वरील आदेश**
**(पारित दिनांक १० मार्च, २०२६)**

१. अर्जदार यांनी **बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७** (थोडक्यात 'सदर कायदा' असे संबोधले आहे) चे **नियम २** प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. दाखल कागदपत्रे व अभिलेख तपासले, अर्जदारांतर्फे वकील श्री. **शेखर देवरे** यांचा युक्तीवाद ऐकला. कोणीही हजर होऊन प्रस्तुत अर्ज आव्हानीत केला नाही.

२. अर्जदार **अरुणाबाई निंबा गोसावी, रा. विखरण** ता. शिरपूर, जि. धुळे येथील कायमस्वरूपी रहीवाशी आहेत. मयत **निंबागीर यादवगीर गोसावी** हे अर्जदार क्र. ०१ चे पती व ०२ ते ०३ चे वडील होते व त्यांचे दिनांक २८/११/२०२५ रोजी मौजे विखरण, ता. शिरपूर, जि. धुळे येथे निधन झालेले आहे. मयत **निंबागीर यादवगीर गोसावी** यांची आई देखील मयत आहे. अर्जदार हेच मयत **निंबागीर यादवगीर गोसावी** यांचे कायदेशीर वारस आहेत, याशिवाय मयतास कुणीही वारस नाहीत. अर्जदार यांना मयत **निंबागीर यादवगीर गोसावी** यांच्या वारस प्रमाणपत्राची शासकीय व निमशासकीय कार्यालयात कामाकरिता आवश्यकता आहे त्यामूळे प्रस्तूतचा अर्ज केला असून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास हरकत मागविण्याकरिता दि. ०९/०२/२०२६ रोजी 'आपला महाराष्ट्र' या वृत्तपत्रात जाहीर नोटीस निशाणी क्र. ११ व ग्रामपंचायत विखरण येथे निशाणी ०६ अन्वये जाहीरनामा प्रसिध्द केला. त्याप्रमाणे योग्यरित्या बजावणी होऊन देखील अर्जदार हे मयताचे वारस आहेत व त्यांची मागणी इत्यादी विरुध्द कोणीही व्यक्तीशः अथवा वकीलांमार्फत उपस्थित होऊन हरकत घेतली नाही.

४. अर्जदारांनी अर्जाच्या पुष्टयार्थ अर्जदार क्र. ०१ अरुणाबई निंबा गोसावी चे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. १० वर दाखल केले आहे. रेशन कार्डाची प्रत निशाणी

क्र. १२ मयत **निंबागीर यादवगीर गोसावी** यांचा मृत्यू दाखला निशाणी क्र. १३ वर आहे. तसेच अर्जदारांनी त्यांच्या आधार ओळखपत्राच्या प्रती दाखल केल्या आहेत.

५. अर्जदारांनी सांगितले की, त्यांनी वारस दाखला मिळणेकरिता अन्य कोणत्याही न्यायालयामध्ये अर्ज केलेला नाही. अर्जदारांचा साक्षीपुरावा विना आव्हानीत राहिला आहे. सबब, अर्जदार हे मागणीप्रमाणे वारस दाखला मिळणेस पात्र आहेत. वरील सर्व बाबी विचारात घेता मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर केला आहे.

२. **अर्जदार क्र. ०१ अरुणाबई निंबा गोसावी क्र. ०२ मयूर निंबा गोसावी क्र. ०३ माधुरी निंबागीर गोसावी** यांच्या नांवे मागणी केल्याप्रमाणे ते मयत **निंबागीर यादवगीर गोसावी** यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) देण्यात यावे.

३. अर्जदारांनी योग्य तो मुल्याचा मुद्रांक दिल्यानंतर त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2026.03.11 11:44:33 +0530

शिरपूर,
दि. १० .०३.२०२६.

(श्रीमती पूजा ना. कोकाटे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शिरपूर,
जि. धुळे.
**JO Code-2489**